# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/11/2023 (शनिवार) दुपार


## जबरी चोरी

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावर मौजा शितलवाडी रामटेक येथे दिनांक १७/११/२०२३ चे १५.१५ वा. ते दि. १७/११/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मी खुशालराव खोडे, वय ६१ वर्ष रा. शास्त्री वार्ड रामटेक ही आपले पतीसोबत लग्नाचे कार्यक्रमा करिता जात असता फिर्यादी हिच्या मुलाने त्याच्या घरातील मोठ्या गाडीने फिर्यादी व तिच्या पतीला दुपारी ०३.०० वा. दरम्यान लग्न असलेल्या घराकडे जात असलेल्या मार्गावर सोडुन दिल्याने फिर्यादी व तिचा पती सोबत जात असता समोरून येणारा अॅक्टीवा सारख्या गाडीवर डोक्यावर काळया रंगाचे टोपी अंगात काळया रंगाची फुल शर्ट व पांढऱ्या रंगाची फुलपँट व पांढऱ्या स्कार्फ गळयात घातलेला अनोळखी ईसम समोरून त्याच्या बाजुला येवुन फिर्यादी हिने गळयात घातलेले सोन्याचे मंगळसुत्र अनोळखी ईसमाने गळयात हात टाकुन सोन्याचे मंगळसुत्र २.५ तोळा किंमती अंदाजे ६५०००/– रू तोडुन गाडीने पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर नागपुर ते उमरेड बस स्टॅन्ड येथे दिनांक १५/११/२०२३ चे ०३.१५ वा. ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गं. भा अल्का बळवंतराव पोळ, वय ५६ वर्ष, रा. ह. मु. नालवाडी वास्तुविश्व अपार्टमेंट भाग क्र. ०१ प्लॉट नं ०३ वर्धा ही भाऊबिज सणा निमित्य फिर्यादीचा भाऊ नामे– अनिल येवले, रा. उमरेड यांच्याकडे जाणे असल्याने घरचे जुने वापरती सोन्याचे दागिणे व पर्स मध्ये नगदी पैसे घेवुन वर्धा येथुन नागपुर येथे बसने निघाली तेव्हा फिर्यादीच्या पर्स मध्ये ठेवलेले १) प्लास्टीक डब्बीमधील जुनी वापरती सोन्याचे चप्पला कंठी ३ तोळयाची अंदाजे किंमती ९०,०००/–रु व एकाच प्लास्टीक डब्बीमध्ये २) जुनी वापरती ५ ग्रॅम सोन्याची एक अंगठी अंदाजे किंमती १५,०००/– रु व ४ ग्रॅमचे सोन्याचे कानातले टॉप्स अंदाजे किंमती १२,०००/–रु व ३) नगदी १३,०००/–रु असा एकुण १,३०,०००/–रु चे सोन्याचे दागिणे व पैसे व स्टेट बँकचे दोन पासबुक व ए.टी.एम., आधार कार्ड, पँनकार्ड, निवडणुकीचे कार्ड सोबत घेवुन निघाली व गणेशपेठ नागपुर बस स्टँडवर पोहचली तेव्हा उमरेड बस लागण्यास वेळ असल्याने फिर्यादी बस स्टँन्डवर काही वेळ बसली होती तेव्हा फिर्यादीने आपली पर्स चेक केली असता पर्स मध्ये सोन्याचे दागिणे व नगदी पैसे होते काही वेळानंतर उमरेड बस लागल्याने फिर्यादी उमरेड जाण्याकरीता बस मध्ये ०३/१५ वा. दरम्यान बसली तेव्हा बस मध्ये खुप गर्दी होती बस उमरेड करीता जाण्यास निघाली तेव्हा फिर्यादी अंदाजे ०४/३० वा. उमरेड बस स्टॉपवर उतरुन बस स्टॉपला लागुनच असलेल्या फिर्यादीच्या भावाच्या घरी गेली व घरी गेल्यावर तिच्या जवळ असलेल्या हॅन्डबॅगची पाहणी केली असता त्या मध्ये ठेवलेले १) प्लॉस्टीक डब्बीमध्ये जुनी वापरती सोन्याचे चप्पला कंठी ३ तोळयाचे अंदाजे किंमती ९०,०००/–रु व एकाच प्लॉस्टीक डब्बीमध्ये २) जुनी वापरती ५ ग्रॅम सोन्याची एक अंगठी अंदाजे किंमत १५,०००/– रु व ४ ग्रॅमचे सोन्याचे कानातले टॉप्स अंदाजे किंमती १२,०००/–रु व ३) नगदी १३,०००/–रु असा

एकुण १,३०,०००/— चे सोन्याचे दागिणे व पैसे व काही कागदपत्र हे दिसुन आले नाही. नागपुर वरुन उमरेड बस मध्ये बसल्यावर कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या पर्स मधुन नमुद मुद्देमालाची चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. रविंद्र वाघ पोस्टे उमरेड मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर